Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २०० • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२५ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# भाजपने २२ अब्जाधीश तयार केले, आम्ही कोट्यवधी लखपती तयार करणार

## राहुल गांधींचे अमरावतीत शेतकरी कर्ज माफीचेही आश्वासन

**अमरावती (वृत्तसंस्था)**–स्वातंत्र्यानंतर भारताच्या इतिहास पहिल्यांदाच संविधानावर आक्रमण होत असल्याचा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खासदार राहुल गांधी यांनी केला आहे. भाजपने २२ अब्जाधीश तयार केले आहेत. तर आम्ही कोट्यवधी लखपती तयार करणार असल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. महालक्ष्मी योजनेच्या माध्यमातून कोट्यवधी महिलांच्या खात्यात दरमहा ८५०० रुपये म्हणजेच एका वर्षात १ लाख रुपये दिले जातील. यातून कोट्यवधी लखपती तयार करणार असल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला आहे.

एकीकडे महाविकास आघाडी इंडिया आघाडी संविधानाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करत आहे. भारतीय संविधान हिंदुस्तानच्या आवाज आहे. हे संविधान कोणीही बदलू शकत नाही. जगातील कोणतीही शक्ती संविधान बदलू शकत नाही. संविधान बदलण्याची कोणाची हिम्मत आहे, ते आम्ही पाहतो, असा इशारा देखील राहुल गांधी यांनी दिला आहे. अमरावती लोकसभा मतदारसंघातील महाआघाडीचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या प्रचारासाठी सभेच्या आयोजन करण्यात आले होते, या वेळी राहुल गांधी बोलत होते.भारतातील शेतकरी, गरीब, बेरोजगार युवा, महिला यांचे एक रुपयाचे देखील कर्ज नरेंद्र मोदी यांनी माफ केले नाही. तर श्रीमंतांचे सोळा लाख कोटी रुपयांचे कर्ज नरेंद्र मोदी यांनी माफ केले असल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला आहे. १६ लाख कोटी रुपये म्हणजे मनरेगाचे पंचवीस वर्षाचे बजेट असल्याचा देखील आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. म्हणजेच पंचवीस वर्षांचा मनरेगाचा पैसा नरेंद्र मोदी यांनी २२ श्रीमंतांना वाटले असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.राज्यातील आशा आणि अंगणवाडी सेविकांचे उत्पन्न देखील दुपटीने वाढवणार असल्याचे आश्वासन राहुल गांधी यांनी दिले आहे. खासगी क्षेत्रात आणि सरकारी नोकरीत महिलांना ५० टक्के आरक्षण आम्ही देणार असल्याचे देखील राहुल गांधी यांनी म्हटले आहे. ही पहिली यादी झाली, आता दुसरी यादी देखील आम्ही देत असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. पहिल्या यादीमध्ये भारतातील सर्वात गरीब कुटुंबीयांना एक लाख रुपये देत आहोत तर दुसऱ्या यादीत बेरोजगार युवकांना अप्रेंटिसशिपचा अधिकार आम्ही देणार असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले आहे.



## डॉ.विकास आमटे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पाचव्या उन्हाळी योग व क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे थाटात उद्घाटन








**आनंदवन । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती संचालित आनंद निकेतन महाविद्यालयामध्ये पाचव्या उन्हाळी योग व क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दि.२० एप्रिल ते १० मे पर्यंत करण्यात आले आहे.सलग पाचव्या वर्षी पण शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा यांनी उत्कृष्ट आणि शिस्तबद्ध शिबिराचे आयोजन केले आहे.या शिबिराचा उद्घाटन समारंभ दि.२० एप्रिल ला महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ.विकास आमटे यांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी मंचावर विशेष अतिथी म्हणून महारोगी सेवा समिती अंतर्गत व्यवस्थापक पल्लवी आमटे उपस्थित होते. तसचे प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मृणाल काळे, उपप्राचार्य राधा सावणे, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. तानाजी बायस्कर उपस्थित होते. डॉ.विकास आमटे यांनी सर्व शिबीरार्थ्यांना या उन्हाळी शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.तसेच सर्व पाहुण्यांनी सुद्धा शिबिरार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या पाचव्या उन्हाळी शिबिराचे संयोजक आणि सहसंयोजक म्हणून अमेय नागापुरे व धीरज कुंडगिर यांची निवड करण्यात आली.

या उन्हाळी योग व क्रीडा प्रशिक्षण शिबिरामध्ये ऐकून २८ खेळाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे त्यामध्ये मल्लखांब, रोप मल्लखांब,मैदानी खेळ, कबड्डी, खो खो, सेपक टकरॉ, हँडबॉल, बेसबॉल, नेटबॉल, बॅडमिंटन, बॉल बॅडमिंटन, लॉन टेनिस, फुटबॉल, क्रिकेट, बॉक्सिंग, कुस्ती, बास्केटबॉल, टेबल टेनिस, क्रिकेट, व्हॉलीबॉल, योगा, तायक्कांदो, प ॉवरलिफ्टिंग, धनुर्विद्या, कराटे, वूषु, बुद्धिबळ आणि या वर्षी पासून एरियल सिल्क हा खेळ नव्याने समाविष्ट करण्यात आला तसेच भारतीय पारंपरिक खेळांचे सुद्धा प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामध्ये लाठी काठी,घुंगरू काठी, दंडबैठक, जोडी कवायत, डंबेल, लेझीम,दानपट्टा यांचा समावेश आहे.या शिबिरामध्ये एकूण ७०० शिबिरार्थी सहभागी झाले आहे. त्यांना ऐकून ७० राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक प्रशिक्षण देणार आहे. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सर्व शिबिरार्थी, पालक, क्रीडा प्रेमी, प्रशिक्षक उपस्थित होते.उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक शिबिराचे शिबिर संयोजक अमेय नागापुरे यांनी केले.त्यांनी या शिबिरामागील उद्देश पटवून दिला.तसेच सूत्रसंचालन महेश सोनावणे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिबीर प्रमुख प्रा. तानाजी बायस्कर यांनी केले.

## विहिरी बांधकामात व रस्ते बांधकामात मोठा भ्रष्टाचार–विलास डांगे यांचा आरोप

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यात अनेक शेतकऱ्यांना नरेगा योजनेतून जलसिंचनाकरिता विहिरी मंजूर करण्यात आपल्या. यामध्ये एकाच लाभार्थ्यांना दोन दोन विहिरी मंजूर केल्या असून बांधकाम झालेल्या बऱ्याच विहिरी निकृष्ट बांधकाम केल्यामुळे खचल्या आहे. त्यामुळे पैसे वाचविण्याचे उद्देशाने चिमूर तालुक्यातील भाऊसाहेब राठोड कृषी अधिकारी पंचायत समिती यांनी पदाचा गैरवापर करित खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ घेत नियमबाह्य विहीर मंजुरी करिता मदत केली. तसेच बांधकाम विभागाने ही अनेक गावातील रस्त्याचे बांधकाम करताना मोठा भ्रष्टाचार केल्याचा आरोप माजी जिल्हा परिषद सदस्य विलास डांगे यांनी केला आहे.

डोमा खापरी येथील शेतकरी चरनदास रामटेके हे शिक्षक म्हणून नोकरीं करतात. त्यांचे वार्षिक उत्पन्न दोन लाखाहुन अधिक असल्याने सदर लाभार्थी नियमात बसत नाही. तरीही स्वतःचे आर्थिक हित साधून त्यांना मदत केली. व विहीर मंजूर करून पैसे काढण्यात आले. किसन धारणे मुक्काम कोटगाव यांच्या विहीरीच्या फक्त ५ रिगांचे बांधकाम झाले असून त्यांनाही २४०००० हजार रुपयांचे बिल काढण्यात आले. तसेच संपत गजभिये मुक्काम अडेगाव देश यांना दोन विहीर मंजूर करून बाबासाहेब आंबेडकर व नरेगा योजना असतांना दुसरी विहीर मंजूर केली. तर काही लाभार्थी यांचे मंजूर लोकेशन ठिकाणी विहिरीचे बांधकाम केले नाही. अशा प्रकारे भाऊसाहेब राठोड यांनी शासनाची दिशाभूल करून भ्रष्टाचार केला. याची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाही करावी.

तसेच मनरेगा अंतर्गत

चिमुर तालुक्यातील मालेवाडा, खापरी, आंबेनेरी, टीटवी, पारडपार, सिरसपूर, शिवरा, सावरगाव, गदगाव, गडपिपरी, गोठणगाव, पुयारदंड येथील रस्ते मुरूम काम, रस्ते खडीकरण, सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक व इतर बांधकाम नियमानुसार केले नाही. यात पिटीओ, एपीओ, सहायक लेखाधिकारी, ग्रामसेवक व ग्राम रोजगार सेवक यांनी मिळून कोठ्यावदिच्या निधीचा गैरमार्गाने दुरुपयोग करून अनियमित्तता, अपहार, करून कायद्याचा भंग केला. याची चौकशी करून कारवाही करावी, अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य विलास डांगे यांनी केली आहे.

## भद्रावती येथे बालकुमार फन अँड लर्न संस्कार शिबिराचे आयोजन

**भद्रावती । प्रतिनिधी**

मागील १७ वर्षांपासून अखंड परंपरेचा वारसा कायम ठेवत स्थानिक साईप्रकाश बहु. कला व शिक्षण संस्थेच्यावतीने हुतात्मा स्मारक नागमंदिर च्या समोर येथे वय वर्ष ६ ते १५ वयोगटातील बालकांकरीता बाल कुमार फन अँड लर्न उन्हाळी संस्कार शिबिराचे आयोजन २५ एप्रिल ते २ जून या कालावधीत करण्यात येतं आहे.या शिबिरात चित्रकला, कागदकाम, नाट्य, नृत्य, संगीत, कराटे, लाठी काठी, स्केटिंग, स्विमिंग, मातीकाम, बौद्धिक व पारंपरिक खेळ, विविध प्रकारच्या कला, क्षेत्रीय भेटी, विध्यार्थ्यांचा कल व भविष्यकालीन गरजा, स्टेज डेरींग,आरोग्य तपासणी,या सर्व गोष्टी लक्षात घेऊन तज्ज्ञ मार्गदर्शकानकडून बरेच उपक्रम घेण्यात येतं आहे.तरी इच्छुक पालक व पाल्यांनी क्षितिज शिवरकर, विनोद ठमके, शालिक दानव, सचिन बेरडे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## शक्तीचा सदुपयोग केल्यानेच हनुमंत चिरंजीव–सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रावण आणि हनुमान दोघेही शक्तिशाली होते. रावणाने आपल्या शक्तीचा दुरुपयोग केला, तर हनुमानाने सदुपयोग केला. त्यामुळे युगानुयुगे लोटल्यानंतर आजही रावणाचे दहनच होत आहे आणि विश्वाच्या कल्याणासाठी आणि रावणाच्या तावडीतून माता सीता यांना मुक्त करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल हनुमानाची पूजा होत आहे. आणि त्याच कारणाने हनुमंत चिरंजीव आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

मुल मार्गावरील चिचपल्ली येथे भागवताचार्य श्री मनीषजी महाराज यांच्या वतीने आयोजित हनुमान जयंती कार्यक्रमात ते बोलत होते.



यावेळी भागवताचार्य श्री मनीष महाराज, डॉ. तन्मय बिडवाई, भाजपा जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा, श्री मधू महाराज उपस्थित होते. यावेळी बोलताना ना. मुनगंटीवार म्हणाले की, ‘गेल्या वर्षी दिवाळीत आपण चिचपल्ली येथे ६५ फुटाच्या श्री हनुमान मूर्तीला विद्युत रोषणाई करण्याचा शब्द दिला होता. हनुमान जयंतीच्या पावन पर्वावर दिलेला शब्द पूर्ण करताना आपल्याला आनंद होत आहे. लवकरच या परिसरातून महामार्गाचे काम पूर्ण होणार आहे. नव्या महामार्गावरून प्रवास करताना विविध राज्यातील भक्तांना हनुमंताचे दर्शन होईल, असे ना. मुनगंटीवार म्हणाले.हनुमान मंदिराच्या परिसरात वेगवेगळी भजने आणि भक्तीगीते ऐकायला मिळतील. त्यामुळे चिचपल्ली भागात कायम भक्तिमय वातावरणाचा अनुभव घेता येईल, असा विश्वास ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. मूर्तीच्या रोषणाईच्या लोकार्पणानंतर ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते हनुमानाची महाआरती करण्यात आली.

# खरीप हंगामाचे योग्य नियोजन करा जिल्हाधिकाऱ्यांच्या कृषी विभागाला सुचना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

खरीप हंगामाला आता सुरवात होणार आहे. शेतक–यांच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा हंगाम आहे. जिल्ह्यात खते, बियाणे, कृषी निविष्ठा आदींची कमतरता जाणवणार नाही, याबाबत दक्षता घेऊन खरीप हंगामाचे योग्य नियोजन करावे, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी कृषी विभागाला दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात कृषी विभागाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, आत्माच्या प्रकल्प संचालक प्रिती हिरुळकर, कृषी उपसंचालक चंद्रकांत ठाकरे, महावितरणच्या अधिक्षक अभियंता संध्या चिवंडे, कृषी विकास अधिकारी विरेंद्र राजपूत, नाबार्डचे व्यवस्थापक तृणाल फुलझेले, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रशांत धोंगळे यांच्यासह तालुका कृषी अधिकारी



उपस्थित होते.जिल्ह्यात बोगस बियाणांची वाहतूक व विक्री होणार नाही, याबाबत पोलिस विभागाच्या सहकार्याने मोहीम राबवावी, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, कृषी यंत्रणांनी पावसाळ्याला सुरवात होण्यापूर्वीच सुक्ष्म नियोजन करावे. जिल्ह्यात खते, बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध झाले पाहिजे, यादृष्टीने आतापासूनच कार्यवाही करावी. खरीप विमा मंडळनिहाय काढणे गरजेचे आहे. जेवढे खरीपाचे क्षेत्र आहे, त्यापेक्षा जास्त क्षेत्राचा विम्यामध्ये समावेश असू नये. यासाठी तालुका कृषी अधिका–यांनी फिल्डवर जावे. तसेच ई–केवायसी बाबत विशेष मोहीम राबवावी. तृणधान्याला चांगली मागणी व भाव असून जिल्ह्यात तृणधान्याचे उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावेत. कृषी विषयक माहिती शेतक–यांना बांधावर मिळण्यासाठी प्रात्यक्षिकांची संख्या वाढवावी, अशा सुचना जिल्हाधिका–यांनी दिल्या.


जिल्ह्यात रब्बी क्षेत्रात वाढ : सादरीकरण करतांना जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री. तोटावार म्हणाले, जिल्ह्यात एकूण ५ लक्ष ५२ हजार ७२९ हेक्टर (४८.३० टक्के) क्षेत्र लागवडीखाली असून खरीप हंगाम २०२४ – २५ मध्ये धानासाठी १ लक्ष ९१ हजार हेक्टर, कापूस १ लक्ष ८० हजार हेक्टर, सोयाबीन ७५ हजार हेक्टर, तूर ३६ हजार हेक्टर व इतर पिकासांठी पेरणी क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले आहे. जिल्ह्यात रब्बी हंगामात सरासरी पेरणी क्षेत्र ८८२४५ हेक्टर असून प्रत्यक्षात १ लक्ष २० हजार ८४ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. ही पेरणी सरासरीच्या १३६ टक्के आहे.

जिल्ह्यात खतांची उपलब्धता : जिल्ह्यासाठी युरीया, डीएपी, एमओपी, एसएसपी, संयुक्त खते आणि मिश्र खते असे एकूण १ लक्ष ५६ हजार ३०० मेट्रीक टन खते कृषी आयुक्तालयाकडून मंजूर झाले आहे. २४ एप्रिल २०२४ अखेर जिल्ह्यात ८९३२९ मेट्रीक टन साठा शिल्लक आहे.

# अर्धवट उपचारः पुढे धोक्याचा सुमार!

**धक्कादायक असे की, मलेरिया- हिवताप आजाराच्या उच्चाटनासाठी २५ एप्रिल या दिवशी भलेही जागतिक मलेरिया दिन साजरा होतो. मात्र वास्तव असे की, जगभरात प्रत्येक दोन मिनिटांना एका बाळाचा अथवा लहान मुलाचा मृत्यू केवळ मलेरियाने होतो. ही जागतिक पातळीवरील सरासरी आहे. मलेरिया हा डासांच्या चावण्यामुळे होणारा रोग आहे. डासांद्वारे त्याचा प्रसार होतो. याचा प्रादुर्भाव विषुववृत्तीय भागांत जास्त आहे. आपण डॉक्टर नाही, तरी सतर्कतेसाठी हे ठावे असावे. मलेरियाचे गांभीर्य लक्षात घेता जागतिक मलेरिया दिन पाळण्याची निकड भासू लागली. अधिक माहितीसाठी वाचा हा श्री एन. के. कुमार गुरूजी यांचा लेख... संपादक.**

मलेरियाला समूळ संपवण्यासाठी डब्ल्यूएचओ व आरबीएम एकत्र आले आहेत. त्याच्या समूळ उच्चाटनासाठी राजकीय, सामाजिक पातळीवर एकत्र येणे, विशिष्ट अजेंडा तयार करणे अशी त्यांची संकल्पना आहे. प्रोटोजुअन प्लाज्मोडियम नावाच्या कीटाणूच्या एनोफिलीज मादी डासापासून मलेरिया होतो. आजवर या आजाराने जगभरात अनेकांचे बळी घेतले आहेत. या आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न सुरु असतानाच अवघे जग आज कोरोना व्हायरस अर्थातच कोव्हिड-१९ या विषाणूचा सामना करत आहे. जागतिक आरोग्य संघटना डब्ल्यूएचओने या विषाणूचे वर्णन साथिचा आजार असे केले आहे. दरम्यान जागतिक आरोग्य संघटनेने मलेरिया आणि इतर साथींच्या आजारांचा अनुभव लक्षात घेता जगभरातील देशांनी कोरोनाचे संकट लवकरात लवकर कसे निपटता येईल, यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलावीत. महत्त्वाचे असे, की आज जागतिक मलेरिया दिन आहे. प्लाझमोडियम या जातीच्या डासांमुळे होणारा हा रोग तसा फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकात हिपोक्रॅटिस यांना मलेरिया सदृश्य आजार माहीत होता. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात जैलुइट लोकांनी पेरू देशात सिंकोना ही वनस्पती आणली होती. या सुमारास जेव्हा युरोपमध्ये फार मोठ्या प्रमाणात मलेरियाची साथ आली. तेव्हा या सिंकोना वनस्पतीचा त्या तापावर उपचार करण्यात आला होता. या उपचारांमुळे मलेरिया आणि अन्य प्रकारचे ताप यांतील फरक सिडनर्हेम आणि अन्य वैद्यांना ओळखणे शक्य झाले. इ.स. १८८०मध्ये लेव्हेरान यांनी मलेरिया निर्माण करणाऱ्या डासांचा शोध लावला, परंतु या डासांचे प्रामुख्याने जे तीन प्रकार आहेत, त्याचा शोध त्यावेळी लागला नव्हता.



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

जागतिक मलेरिया दिन हा २५ एप्रिल रोजी जगभर साजरा केला जातो. इ.स.२००८मध्ये अफ्रिकेत हा दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला. मलेरिया या साथीच्या आजाराने आजवर जगभरात अनेकांचा बळी घेतला आहे. त्यामुळे अवघ्या जगाने एकत्र येत मलेरिया आजाराचे संपूर्ण उच्चाटन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जागतिक मलेरिया दिन साजरा केला जातो. सन २००७ या वर्षाच्या मे महिन्यात भरलेल्या साठव्या जागतिक आरोग्य परिषदेत हा दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. या परिषदेला उपस्थित असलेल्या ४४ देशांनी एकमुखाने ही घोषणा केली. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या आकडेवारीनुसार सन २००० ते २००४ या कालावधीत मलेरियामुळे होणाऱ्या मृत्यूच्या प्रमाणात मोठी घट झालेली दिसते. या काळात मृत्यूदर सुमारे ४० टक्क्यांनी घसरला आहे. ही आनंदाची बाब आहे. जागतिक आरोग्य संघटनेचा २०१९चा अहवाल सांगतो, की सन २०१४ ते २०१८या काळात मात्र मलेरियाचा प्रादुर्भाव कमी करण्यात जागतिक पातळीवर विशेष यश आले नाही. साधारण सन २०१७मध्ये मलेरियाने जेवढे मृत्यू झाले तेवढेच २०१८मध्येही झाले. त्यामुळे मलेरिया उच्चाटनाचे महत्त्व अधिक वाढले आहे. हा डास मलेरियाचा वाहक आहे. या डासांचे नियंत्रण हा मलेरिया रोखण्याचा परिणामकारक उपाय आहे.

इ.स.१८९४ साली रॉस यांनी या संदर्भात पुढील संशोधन करण्याचे ठरविले. त्यांनी, ज्या रोग्यांना मलेरिया झाला आहे. त्यांना चावा घेण्यास डासांना उद्युक्त केले. या मलेरिया ग्रस्त रोग्यांना डास चावल्यावर, त्या डासांच्या शरीरात मलेरियाच्या जंतूंचे काय होते? कोणकोणते आणि कसे बदल होतात? याचा अभ्यास सुरू केला; परंतु पहिली दोन वर्षे त्यांत फारशी प्रगती झाली नाही, तरीही नाउमेद न होता त्यांनी अभ्यास चालूच ठेवला होता. इ.स. १८९७मध्ये त्यांच्या प्रयत्नांना यश आले. त्यांना दिसून आले की, डासांच्या जठरामध्ये बटणाच्या आकाराच्या जंतूंची अनेक अंडी तयार होतात. ही अंडी त्या डासांच्या लाळेत येतात आणि असे डास जेव्हा माणसांना चावतात तेव्हा त्या माणसांमध्ये पुरेशी प्रतिकारशक्ति नसेल त्यांना मलेरिया होतो. हे त्यांचे संशोधन बहुमोलाचेच होते.

इ.स.१८९४मध्ये मॅनसन यांनी असे गृहीतक मांडले, की मलेरिया हा रोग डासांमुळे होत असून तो या जंतूंनी युक्त डास चावा घेऊनच नव्हे, तर पाण्यावाटे पसरवीत असावेत. पुढे इ.स. १८९८मध्ये रॉस यांनी मलेरिया डासांमुळे नेमका कसा होतो, याचा शोध लावला. पक्ष्यांमधील मलेरिया प्रमाणेच मानवी शरीरांतही घडामोडी होत असल्या पाहिजेत, असे त्यांना दिसून आले. त्याच वर्षी ग्रासी, बिगनमी आणि बास्टिनेली यांनी ॲनोफेलिस जातीच्या डांसामध्ये प्लाझमोडियम, फाल्सिपॅरम या जातीच्या मलेरियाच्या जंतूंची कशी वाढ होते आणि पुढे ते संसर्गित डास चावल्यामुळे माणसांमध्ये मलेरिया कसा होतो, हे दाखवून दिले. मलेरिया तापात थंडी वाजून ताप येणे आणि पुन्हा तीन चार दिवसांनी ताप येण्यामुळे शरीरात हिमोझाईन हा विषारी पदार्थ दिसून येतो. यामध्ये दोन प्रमुख- १) मलेरियाचे जंतू आणि त्यांचे वातावरण आणि २) नॉफिलस जातीचे डास आणि त्यांचे वातावरण या घटकांचा विचार केला पाहिजे. डासांच्या शरीरांतील मलेरियाच्या जंतूंच्या घडामोडीविषयी आणि हा मलेरिया मानवी शरीरात कसा संक्रमित होतो, याविषयी सर रोनॉल्ड रॉस यांनी मूलभूत संशोधन केले व पुढील अभ्यासकांना दिशा दाखविली. विशेष म्हणजे संशोधनाचे हे कार्य त्यांनी बव्हंशी आपल्या हिंदुस्थानात कलकत्ता आणि बंगलोर येथे केले. या संशोधनासाठी इ.स.१९०२चे नोबेल पारितोषिक त्यांना मिळाले. रोनाल्ड रॉस यांचा जन्म अलमोडा येथे इ.स.१८५७मध्ये झाला. त्यांचे वडील सर सी.सी.जी.रॉय हे इंग्रजांच्या सैन्यामध्ये जनरल होते. रोनाल्ड रॉस यांचे शिक्षण इंग्लंडमध्ये झाले आणि वैद्यकाच्या अभ्यासासाठी त्यांनी इ.स.१८७५ मध्ये लंडन येथील सेंट बार्थिलोमोव्ह हॉस्पिटलमध्यें प्रवेश घेतला. इ.स.१८८१मध्ये डॉक्टर झाल्यावर ते इंडियन मेडिकल सर्व्हिसमध्ये काम करू लागले. डासांमुळे मलेरिया होत असावा असा काहीसा तर्क त्यापूर्वी एक शतक आधी करण्यात आला असला, तरी त्यावर पुरेसा प्रकाश टाकण्यात आलेला नव्हता. मलेरिया नेमका कसा होतो? तो कसा पसरतो व त्याला प्रतिबंधक कसा करता येईल? याबद्दल त्यावेळी निश्चित स्वरूपाची काहीही माहिती उपलब्ध नव्हती.

मलेरिया रूग्णात- १) थंडी वाजण्याचा त्रास सुमारे १५ मिनिटे ते तासभर चालतो. २) थंडी वाजून ताप येतो. ताप थोडा वेळ टिकतो. ३) ताप कमी होताना घाम येऊन उतरतो. ४) ताप सहसा दुपारनंतर येतो. ताप सहसा दिवसाआड किंवा रोज येतो. ५) तापाबरोबर खूप डोकेदुखी, अंगदुखी, कंबरदुखी, थकव, इत्यादी लक्षणे जाणवतात. पण हे वेळापत्रक अगदी पक्के नसते. याबरोबर पाठही दुखते. मलेरिया सौम्य असेल किंवा उपचार अर्धवट झाले तर लक्षणे सौम्य असतात. कधीकधी फक्त अंगावर काटा येणे, डोके दुखत राहणे, थकवा जाणवणे एवढीच लक्षणे असतात. अशा तक्रारी खूप असतात. रक्तनमुना तपासल्याखेरीज याचा नक्की निर्णय करणे अवघड असते. मलेरियाच्या तापामुळे काही वेळा मेंदूला सूज येऊन झटके येण्याची शक्यता असते. ही शक्यता बालकांमध्ये जास्त प्रमाणात आढळते. प्लास्मोडियम फाल्सिपॅरम प्रकाराच्या जंतूंमुळे रुग्ण कोमात जायची व दगवण्याची शक्यता असते. काही रुग्णांत मूत्रपिंड निकामी होऊन लघवीत फुटलेल्या लाल रक्तपेशी दिसून येतात.

धक्कादायक असे की, मलेरिया- हिवताप आजाराच्या उच्चाटनासाठी २५ एप्रिल या दिवशी भलेही जागतिक मलेरिया दिन साजरा होतो. मात्र वास्तव असे की, जगभरात प्रत्येक दोन मिनिटांना एका बाळाचा अथवा लहान मुलाचा मृत्यू केवळ मलेरियाने होतो. ही जागतिक पातळीवरील सरासरी आहे. मलेरिया हा डासांच्या चावण्यामुळे होणारा रोग आहे. डासांद्वारे त्याचा प्रसार होतो. याचा प्रादुर्भाव विषुववृत्तीय भागांत जास्त आहे. आपण डॉक्टर नाही, तरी सतर्कतेसाठी हे ठावे असावे. मलेरियाचे गांभीर्य लक्षात घेता जागतिक मलेरिया दिन पाळण्याची निकड भासू लागली. म्हणून सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि डासांनाना पिटाळण्याच्या पद्धती प्रकर्षाने अवलंबिणेच फायद्याचे राहील.

!! विश्व मलेरिया दिनानिमित्त सप्ताहभर प्रेरणादायी हार्दिक शुभेच्छा !!

# २३ जागांचा निर्णय घेणाऱ्या नेतृत्वाला चारच जागा मिळतात ही शोकांतिका:अमोल कोल्हे



**पुणे**-२३ जागांचा निर्णय घेणाऱ्या नेतृत्वाला चारच जागा मिळतात ही शोकांतिका आहे असे म्हणत राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली आहे. तसेच सर्व्हेनुसार त्या चार जागाही अजित पवार गट जिंकु शकणार नाही असेही ते म्हणालेत.

महायुतीच्या जागावाटपात केवळ चारच जागा अजित पवार गटाला सुटल्या. यानंतर अजित पवार गटात नाराजी असल्याच्या चर्चा सुरू आहेत. यावर अमोल कोल्हे यांनी भाष्य केले आहे. अमोल कोल्हे म्हणाले की, ''खरं तर हा त्यांच्या पक्षातील अंतर्गत प्रश्न आहे. कुठल्याही पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये अशा प्रकारच्या नाराजी असणे स्वाभाविक आहे. कारण जे नेतृत्व एकेकाळी २३ जागांचे निर्णय घेऊ शकत होते त्यांना अवघ्या आता चार जागा मिळतात. ही परिस्थिती लोकसभेला असेल तर विधानसभेला काय परिस्थिती असेल हा संभ्रम कार्यकर्त्यांमध्ये निर्माण होणे स्वाभाविक आहे'', असे मत अमोल कोल्हे यांनी व्यक्त केले.

तसेच पुढे अमोल कोल्हे यांनी महायुतीमध्ये या चार जागांवरही अजित पवार गटाचा विजय होणार नाही असे म्हंटले आहे. ते म्हणाले, ''महायुतीची खूप मोठी घसरण होणार आहे. सर्व्हेमध्ये ज्या चार जागा अजित पवार गटाला मिळाल्या त्यावर त्यांचा विजय होणार नसल्याचे चित्र आहे. तसेच ज्या जागा मिळाल्या आहेत त्या चार जागांवर एक उमेदवारी घरात द्यावी लागली तर एक पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांना जागा लढवावी लागत आहे. तर उर्वरित दोन जागांवर उमेदवार आयात करावे लागले'', असा टोला अमोल कोल्हेंनी लगावले.महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी ही माजी शेवटची निवडणूक आहे, असं म्हणत मतदारांना भावनिक साद घालण्याचा प्रयत्न केला. यावर कोल्हे म्हणाले की, ''ही लोकसभेची निवडणूक आहे. कोणाची पहिली निवडणूक की शेवटची नाही. त्यामुळे आढळराव पाटील यांच्या वयाचा मान ठेवत मी त्यांना एवढंच सांगेल की आपण देशाचं बोलूयात. त्यांना काय वाटत मला काय वाटत यापेक्षा जनतेला काय वाटत हे महत्वाचं आहे'', असा हल्लाबोल त्यांनी केला.

# नवनीत राणांच्या पराभवात सर्वात मोठा हात भार रवी राणांचा असेल-आमदार बच्चू कडू



**अमरावती**-रवी राणा यांच्यामुळेच नवनीत राणा यांचा पराभव होणार आहे असा दावा प्रहारचे आमदार बच्चू कडू यांनी केला आहे. ते आज प्रसार माध्यमांशी बोलत होते. अमरावतीमध्ये भाजपकडून नवनीत राणा यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर वातावरण चांगलंच तापले आहे. बच्चू कडू यांचा राणांच्या उमेदवारीला विरोध होता. त्यानंतर या दोन्ही नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरू आहेत.

आमदार रवी राणा यांनी अमरावतीचे प्रहारचे उमेदवार दिनेश बूब यांच्यावर खालच्या शब्दांत टीका केली होती. त्यांच्या या टीकेला प्रत्युत्तर देताना बच्चू कडू म्हणाले, ''रवी राणांनी इतक्या व्यक्तिगत पातळीवर जाऊन आमच्या उमेदवारावर आरोप करू नये. ज्याचं घर मातीचं आहे, त्यांनी दुसऱ्यांच्या घरावर दगड मारू नये. नवनीत राणांचा पराभव करण्यासाठी सर्वात मोठा हातभार रवी राणांचा असेल. नवनीत राणा यांच्या पराभवाचे सर्वात मोठे श्रेयही रवी राणांना जाईल. रवी राणा व्यवस्थित वागले असते तर ही वेळ आली नसती'', असे बच्चू कडू यांनी म्हंटले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वर्ध्यातील सभेत तुम्ही उमेदवाराकडे पाहू नका. मला पाहून मतदान करा, असं आवाहन केले होते. यावरून बच्चू कडू यांनी टोला लगावला आहे. ते म्हणाले, ''पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्पष्ट सांगितले की, आमचा उमेदवार कार्यक्षम नसेल तर मला पाहून मतदान करा, याचा अर्थ स्पष्ट आहे. त्यांचे उमेदवार कार्यक्षम नसल्याचं स्पष्ट झालं आहे'', असा टोला बच्चू कडू यांनी लगावला.दरम्यान, आमदार रवी राणा यांनी बच्चू कडू यांचे उमेदवार दिनेश बुब यांच्यावर जोरदार टीका केली होती. ''दिनेश बुब हे दुपारी १२ वाजता झोपेतून उठतात. नंतर ग्लासवर ग्लास सुरू होतात. रात्री जुगार खेळतात अशा उमेदवाराला मतदान करू नका. हे लोक निवडून आले तर अमरावतीकडे लक्ष देणार नाही'', अशी टीका रवी राणा यांनी केली होती.

# २९ एप्रिल रोजी पुण्यात पंतप्रधानांची जाहीर सभा

## रोड शोही पार पडणार, ४ उमेदवारांच्या प्रचारासाठी येणार मोदी-अजित पवार



**पुणे**-२९ एप्रिल रोजी पुण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा होणार आहे. तसेच रोड शो देखील पार पडणार आहे अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. ते आज खडकवासला विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यासाठी आले होते. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना विविध सूचना केल्या. पंतप्रधान मोंदींशिवाय भारताला पर्याय नाही. मोदींना आपल्याला तिसऱ्यांना पंतप्रधान बनवायचे आहे असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना केले आहे.अजित पवार बोलतांना म्हणाले की, ''नरेंद्र मोदींना आपल्याला तिसऱ्यांना पंतप्रधान बनवायचे आहे. त्यासाठी सर्व प्रयत्न सुरू आहेत. पंतप्रधान मोंदींशिवाय भारताला पर्याय नाही. त्यामुळे आपल्या सगळ्यांनाच मोठी मेहनत घेऊन मोदींना पंतप्रधान करायचे आहे. मोदी हे २९ एप्रिलला पुण्यात सभा घेणार आहेत. पुणे जिल्ह्यातील चारही मतदार संघाच्या उमेदवारांसाठी सभा घेण्यासाठी मोदी पुण्यात येणार आहे. त्यापूर्वी मोदींचा पुण्यात रोड शो होणार आहे. या चारही उमेदवारांच्या विजयासाठी आपल्याला प्रयत्न करायचे आहेत'', असे अजित पवार म्हणाले.

यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना पुढे ते म्हणाले, ''खडकवासला विधानसभेच्या कार्यकर्त्यांचं काम चांगले आहे. मात्र गावात किंवा कोणत्याही चौकात होर्डिंग लावताना विचार करा. निवडणुकीच्या खर्च जेवढा आहे तेवढ्याच खर्चात सगळ्या गोष्टी बसवा. त्यानंतर कोणत्याही पद्धतीने आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची नक्की कायळी घ्या आणि महत्वाचं म्हणजे कोणत्याहीरित्या गाफिल राहू नका'', असे अजित पवार म्हणाले.तसेच येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी एकत्र येऊन काम करणं गरजेचे आहे. कोणत्याही पद्धतीची नाराजी न ठेवता एकत्र काम केले तरंच मोदींना पंतप्रधान करण्यात आपण यशस्वी हौस शकतो. कार्यकर्त्यांनी बोलतांना योग्य भाषेचा वापर करावा. प्रचार करताना आपल्या आरोग्याची देखील काळजी घ्यावी'', अशा शब्दांत अजित पवारांनी कार्यकर्त्यांना सूचना केल्या आहेत.

# बनावट पत्रे विकणाऱ्या गोवा स्टील दुकानावर कारवाई १३ बनावट पत्रे, प्रिंटिंग मशीनसह ६९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**सांगोला । प्रतिनिधी**

बनावट छपाई करून जे.एस.डब्ल्यू. कंपनीचे बनावट पत्रे विकणाऱ्या सांगोला शहरातील कडलास रोडवरील गोवा स्टील दुकानावर कंपनीच्या वतीने कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत पोलिसांसह कंपनीच्या अधिकाऱ्यांनी छापा टाकून १८ हजार ९८० रुपयाचे बनावट पत्रे आणि पन्नास हजार रुपयाची प्रिंटिंग मशीन असा ६८ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत हंबीरराव ज्ञानू साठे यांनी गोवा स्टीलचे मालक भिमराव तोलाराम चौधरी रा.सांगोला यांच्यावर सांगोला पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.याबाबत अधिक माहिती अशी, हंबीरराव ज्ञानु साठे हे ईआयपीआर इंडिया कंपनीत तपासी अधिकारी म्हणून नोकरीस असून त्यांना जे.एस.डब्ल्यु.कलर कोटेड पत्रे मुळ किंवा नक्कल केलेले कसे ओळखावे याचे प्रशिक्षण दिले आहे. तसेच बाजारात नक्कल केलेला बनावट माल कोणत्या ठिकाणी विक्री होतो, आपल्या मशीनवरती बनवून छपाई होते असे निदर्शनास आले तर स्थानिक पोलीसांच्यामार्फत त्यांच्यावर कारवाई करण्याचे काम करीत असतात.

सांगोला शहरातील कडलास रोडवरील गोवा स्टील या दुकानात मूळ कंपनीचा पत्रा कॉईल प्रेस मशीनमध्ये टाकून त्यावर प्रिंटरने जे.एस.डब्ल्यु. कंपनीच्या नावाने छपाई करून विक्री करीत असल्याची खबर कंपनीचे अधिकारी हंबीरराव साठे यांना मिळाली. त्याबाबत शहानिशा करून सदर दुकान व गोडावून धारकावर कारवाई करण्यासाठी १८.एप्रिल रोजी सांगोला पोलीस ठाण्याचे स.पो.नि.सचिन जगताप, पो.हवा. देवकर, पो.शि. पांढरे असे पोलीस पथक कारवाई करण्यासाठी गेले. कंपनीचे अधिकारी व पोलिसांच्या पथकाने दुकान मालक भिमराव तोलाराम चौधरी रा.सांगोला यांच्या गोवा स्टील दुकानाची झडती घेतली. यावेळी कंपनीचे तपासी अधिकारी हंबीरराव साठेब्यानी जे. एस.डब्ल्यु. कलर कोटेड पत्र्याची तपासणी केली असता त्यावर छोटया अक्षरामध्ये बनावट छपाई छपाई करीत असल्याचे निदर्शनास आले. या कारवाईत पोलिसांनी ६ हजार ८०० रू किंमतीचे आठ फुटाचे ६ पत्रे, ८ हजार ४०० रू किंमतीचे १२ फुटाचे ५ पत्रे, ३ हजार ७८० रू किमतीचे १४ फुटाचे २ पत्रे, ५० हजार रुपये किमतीची प्रिटींग मशीन असा ६८ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# केंद्रासह राज्यात भाजपचे सरकार असतानाही धनगर आरक्षण का मिळाले नाही?-संजय जाधव

**परभणी**-केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार असतानाही धनगर समाजाला आरक्षण का मिळाले नाही? असा सवाल परभणीतील महाविकास आघाडीचे उमेदवार संजय जाधव यांनी महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांना केला आहे. परभणीत लोकसभेचा प्रचार आता शेवटच्या टप्प्यात आला आहे. त्यातच दोन्ही उमेदवारांकडून एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केले जात असल्याचे पाहायला मिळत आहे. प्रसार माध्यमांशी बोलतांना संजय जाधव म्हणाले, ''प्रत्यक्षात धनगर समाजावर कोणी अन्याय केला? केंद्रात आणि राज्यात भाजप सरकार असतानाही धनगर समाजाला आरक्षण का मिळाले नाही? महादेव जानकर यांना शरद पवारांनी माढामधून उमेदवारी जाहीर केली होती, पण जानकर रात्रीतून महायुतीमध्ये सहभागी झाले. जानकारांची निष्ठा कुण्या एका ठिकाणी नाही'', असे म्हणत जाधव यांनी जानकरांसह भाजपवर सडकून टीका केली आहे.पुढे संजय जाधव म्हणाले, जनकर सांगतात माझ्याकडे काही नाही, मी स्टेशनला झोपतो आणि दुसरीकडे निवडणुकीत कोट्यवधी खर्च करतात. मग हे पैसे आले कुठून? असा सवालही जाधव यांनी विचारला आहे. दरम्यान, परभणीच्या पालम तालुक्यातील चाटोरी येथे गावकऱ्यांशी संवाद असताना संजय जाधव बोलत होते.याशिवाय पुढे त्यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. ''ना खायेंगे, ना खाने देंगे लेकीन अकेले डकार देंगे, अशी परिस्थिती आहे. भाजपने आपापसात लावलेलं हे षडयंत्र आहे, या पापाला कारणीभूत भाजप आहे. अनेक वर्षानूवर्षे एका गावातील सर्व समाजाचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत, पण भाजपने समाजा-समाजात तेढ निर्माण करण्याचे काम केले. आपल्या परभणी लोकसभा मतदारसंघात विष पेरले गेले. गावागावात लोक एकमेकांचे तोंड बघायला तयार नाहीत'', असा हल्लाबोल जाधव यांनी भाजपवर केला.

# माजी सैनिक भाऊसाहेब वाबळे (मेजर) यांनी उमेदवारी अर्ज केला दाखल!





अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून माजी सैनिकांच्या भारतीय जवान किसान पार्टी चे अधिकृत उमेदवार भाऊसाहेब वाबळे ( मेजर ) यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. समवेत मनसुख वाबळे, रावसाहेब देवकाते, भगवानराव कोल्हे, युनूस टेंगे, सागर रासकर, रावसाहेब कुलट, कॅप्टन बशीर शेख, अमर वागस्कर , केकती संघटना अध्यक्ष मच्छिंद्र वाघस्कर, रमेश पिंगळे, कारभारी खोमणे, संजय ढगे, संतोष खोमणे, उत्तम बेंडकुळे, मिलिंद बसाटे व सर्व सैनिक संघटनाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०२४ अंतर्गत ३७-अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून आज माजी सैनिकांच्या भारतीय जवान किसान पार्टी चे अधिकृत उमेदवार भाऊसाहेब वाबळे ( मेजर ) यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे प्रस्थापित उमेदवार यांनी चांगलीच दखल घेतली असून हा अर्ज दाखल करते वेळी सोबत मनसुख वाबळे, रावसाहेब देवकाते, भगवानराव कोल्हे, युनूस टेंगे, सागर रासकर, रावसाहेब कुलट, कॅप्टन बशीर शेख, अमर वागस्कर , केकती संघटना अध्यक्ष मच्छिंद्र वाघस्कर, रमेश पिंगळे, कारभारी खोमणे, संजय ढगे, संतोष खोमणे, उत्तम बेंडकुळे, मिलिंद बसाटे व सर्व सैनिक संघटनाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उमेदवार भाऊसाहेब वाबळे म्हणाले भारतीय जवान किसान पार्टी ही सर्वसामान्य जनतेची पार्टी आहे जवान, सर्वसामान्याकरीता काम करणारी पार्टी आहे माजी सैनिकांनी मिळून देशहीतासाठी कार्य करण्यासाठी या पार्टीची स्थापना करण्यात आली आहे .सर्वसामान्यांची जी सध्या ससेहोलपट होत आहे कोणाचा कोणावर विश्वास राहीला नाही आम्ही माजी सैनिक म्हणून देशाच्या कर्तव्यनिष्ठेतेपायी भारतीय जवान किसान पार्टी स्थापन केली आहे जेणेकरून सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी काम करणार आहोत.

भगवानराव कोल्हे म्हणाले की, नगर दक्षिणमधील सर्व संघटना एकत्रित येउन आम्ही फॉर्म भरला असून पहीले पाउल उचलले आहे. सैनिक हा शेतकऱ्यांचा मुलगा असतो देशसेवा करून तो समाजासाठी काहीतरी करू इच्छितो आमचे बरेचे प्रश्न प्रलंबित आहे.सैनिकांकडे बऱ्याचवेळा दुर्लक्ष केले जाते शेतकऱ्यांना दुध, कांदा हे कवडीमोलाने विकावे लागते. शेतकरी व सैनिक त्यांच्या विधवा पत्नी तसेच त्यांच्यावर अवलंबून आहेत अश्या ना न्याय द्यायचा आहे हे उद्दिष्ट ठेवून आम्ही अर्ज भरला आहे.

# वादळी पावसानंतर उन्हाचा पारा चढला

## ग्रामीण भागातही दुपारी भयाण शांतता



**अहमदनगर । प्रतिनिधी**

निसर्गाची करणी आणि नारळात पाणी... अशी म्हणं प्रसिद्ध आहे, तात्पर्य असे की निसर्गाने

असमतोल साधला की वातावरणात मोठ-मोठे बदल पहावयास मिळतात. आणि या वर्षी एप्रिल महिन्यात हे बदल जनतेला अनुभयास मिळाले. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीसच पारा ३८ अंशांवर पोहचला होता.त्यामुळे वातावरणात उष्णता वाढली.असे असतानाअचानकच निसर्ग राजाने बदल घडवून मध्यतरी ठिकठिकाणी हलक्या सरीचा सतत पाऊस झाला. परिणमी वातावरणात गारवा पसरला आणि पारा ३५ च्या खाली गेल्याने ऐन उन्हाळ्यात जनतेला हिवाळ्याची अनुभूती मिळाली. परंतु आता मात्र पाऊस पडून गेल्यानंतर अचानकच तापमान वाढू लागले असून दुपार होताच ग्रामीण भागात भयाण शांतता निर्माण झाल्याचे चित्र आहे.तापमान एप्रिल महिन्याच्या सुरवातीसच ३६/३८ डिग्रीच्यावर जात असून याची झळ ग्रामीण भागातही बसत आहे. एरवी ३४/३५ डिग्री तापमानात आपले दैनंदिन व्यवहार करणारी जनता एप्रिल महिन्यातच जवळपास ३८/४० डिग्री तापमानाचा सामना करू लागल्याने दिवसा १२ वाजताच्या आत घरात बंदिस्त होत आहे. परिणामी दिवसभर रेलचेल असलेल्या ग्रामीण भागातील रस्त्यावर दुपारी शुकशुकाट पसरला असून एप्रिल महिन्यात आता अंगाची लाही लाही होत असल्याने आता वाजले बारा... वाढला उन्हाचा पारा.. असे म्हणत. जनता घराबाहेर पडण्याचे टाळत आहे.वाढत्या तापमानाची झळ नागरिकांना बसल्याने व नागरिक घरी बंदिस्त असल्याने दिवसभर शीत-पेय विक्री सहित इतर ही किरकोळ व्यवसाय करणाऱ्या व्यासायिकांना मात्र, आर्थिक फटका बसत असल्याचे दिसून येत आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीसच तापमानात एवढी वाढ झाली आहे तर समोर येणाऱ्या मे आणि जून महिन्यात काय परिस्थिती राहिल, याची कल्पना न केलेलीच बरी. अशी चर्चा जनसामान्यात होत आहे. एकंदरीत सूर्यनारायणाच्या वाढत्या दाहकतेचे चटके मात्र जनतेपासून तर व्यासायिकांपर्यंत सर्वांनाच बसत आहे. एकूणच काय तर ग्रामीण भागात सध्या भयाण शांतता पसरली आहे.

# या कारणामुळे उपमुख्यमंत्री ना अजित दादा नगरच्या सभेला उपस्थित राहू शकले नाही

**अहमदनगर । प्रतिनिधी**



महायुतीचे नगर दक्षिण चे उमेदवार खासदार सुजय विखे यांच्या प्रचारार्थ आज मुख्यमंत्री ना एकनाथ शिंदे नगर मध्ये हेलिकॉप्टरने पोलीस ग्राउंड वर उतरले, त्यावेळेस हेलीप्याड वर राष्ट्रवादीचे प्रथम जिल्हाध्यक्ष प्रशांत गायकवाड यांनी त्यांचे फुल देऊन स्वागत केले, त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस व अजित दादा पवार येईपर्यंत मुख्यमंत्री येथील रेस्ट रूम मध्ये थांबले ,त्यांच्यासमवेत दीपक केसकर ,प्रवीण दरेकर ,माजी मंत्री कर्डिले ,नामदार राधाकृष्ण विखे पाटील होते

थोड्या वेळातच येथे परत जिल्हाध्यक्ष प्रशांत गायकवाड आले व मुख्यमंत्र्यांना उपमुख्यमंत्री अजित पवारांचा खाजगी निरोप द्यायचा आहे असे पोलिसांना सांगितले , यावेळी प्रशांत गायकवाड यांनी सर्वांसमक्ष मुख्यमंत्र्यांना उपमुख्यमंत्र्यांचा निरोप दिला,यावेळी फोनवर अजितदादा म्हणाले कि आज राष्ट्रवादीचा जाहीरनामा प्रकाशित करायचा आहे व मावळ येथे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले यांच्या चिरंजीवाचा पक्ष प्रवेश आहे ,त्या कार्यक्रमाला उशीर झाला आहे,त्यामुळे मी नगरला येऊ शकत नाही, कोणीही गैरसमज करून घेऊ नये, लवकरच मी कर्जत व पारनेरला सभा घेणार आहे यावेळी माजी मंत्री प्रा राम शिंदे ,प्राभानुदास बेरड, आमदार मोनिका राजळे, माजी आमदार अण्णासाहेब म्हस्के आदि उपस्थित होते.नंतर मुख्यमंत्री यांनी जेष्ठ नेते सबाजीराव गायकवाड यांची विचारपूस केली, त्यांना का नाही आणले असे प्रशांत गायकवाड यांना विचारले

# आमदार जगताप यांच्याकडून पूजा वराडेचा गौरव

## शहराच्या दृष्टीने पूजा वराडेचे यश अभिमानास्पद-आ.संग्राम जगताप

**अहमदनगर । प्रतिनिधी**



आंतरराष्ट्रीय धावपटू पूजा रमेश वराडे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करुन पोलीस उपनिरीक्षकपदी नियुक्ती झाल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांनी तिचा गौरव केला.

भिंगार येथे वराडे यांच्या निवासस्थानी झालेल्या सत्कार सोहळ्याप्रसंगी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे अध्यक्ष संजय सपकाळ, भिंगार येथील देवांग कोष्टी समाजाचे अध्यक्ष किशोर भिंगारकर, स्वामी विवेकानंद प्रबोधिनी ट्रस्टचे अध्यक्ष प्रमोद मुळे, पूजाचे प्रशिक्षक रमेश वाघमारे, शिरीष वराडे, रमेश वराडे, सुनीता वराडे, रत्नमाला वराडे, प्रांजली सपकाळ, संगीता सपकाळ, ज्योती पाचे, कांताबाई परदेशी, सर्वेश सपकाळ, विशाल परदेशी, बाळासाहेब सुर्यवंशी, अभिजीत सपकाळ, विशाल परदेशी, सुंदरराव पाटील, सचिन पैठणकर, अखिलेश पाचे, प्रकाश तरवडे, ईवान सपकाळ, खेडकर आदी उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, पूजा वराडे हिने खेळात शहराचे नाव देश पातळीवर नेले आहे. ती फक्त भिंगार पुरती मर्यादीत नसून, नगर शहराच्या दृष्टीने तिचे यश अभिमानास्पद आहे. आंतरराष्ट्रीय धावपटू म्हणून नावरुपास आल्यानंतर पुन्हा अभ्यासाकडे वळून तिने स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून पोलीस उपनिरीक्षकपदा पर्यंतची मारलेली मजल प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

उपस्थित पाहुण्यांचे स्वागत पूजाचे वडिल रमेश वराडे व आई सुनीता वराडे यांनी केले. यावेळी संजय सपकाळ, किशोर भिंगारकर व प्रमोद मुळे यांनी आपल्या मनोगतात वराडे कुटुंबीयांचे कौतुक करुन पूजा वराडे हिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच भिंगार कॅम्पचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश राजगुरु यांनी देखील पूजा वराडे हिचा सत्कार केला. यावेळी सरपंच रान पानमळकर, माजी जिल्हा परिषद सदस्य राहुल पानसरे, बंटी भुजबळ, नंदकुमार भंडारे, डॉ. अय्युब खान उपस्थित होते.

# सर्वसामान्य जनता माझ्यासोबत, विक्रमी मतांनी विजयी होणार

## आ.नीलेश लंके यांचा विजयाबद्दल आत्मविश्वास;लोकसभा निवडणूकीचा अर्ज साधेपणाने दाखल

**अहमदनगर । प्रतिनिधी**

गेल्या ५० वर्षापासूनच्या विखे कुटुंबाच्या कुट नितीला सर्वसामान्य जनता कंटाळली असून मतदार संघातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वसामान्य जनता माझ्या सोबत आहे. त्यामुळे मी या निवडणुकीत विक्रमी मतांनी विजयी होईल असा आत्मविश्वास आमदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला.

नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे आपण साधेपणाने अंध, अपंग बांधव तसेच महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपण आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असून निवडणूक जिंकण्याचा मला विश्वासच नाही तर यश हे आपलेच असल्याचा आत्मविश्वास आ. नीलेश लंके यांनी व्यक्त केला. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रतात्या फाळके, आपचे जिल्हाध्यक्ष राजू आघाव हे अर्ज दाखल करताना उपस्थित होते.

अर्ज दाखल केल्यानंतर निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर दररोज फिरत आहात. विजयाबाबत विश्वास वाटतो का असे पत्रकारांनी विचारले असता लंके म्हणाले, विश्वासच नाही यश आपलेच आहे. धनशक्ती विरूध्द जनशक्ती अशी ही निवडणूक आहे.

लंके म्हणाले, अंध, अपंग तसेच महाविकास आघाडीतील सर्व घटकपक्षांचे नेते अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित होते. आज हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर अर्ज दाखल करण्यात आला असून हनुमानरायांकडे मी प्रार्थना केली की नगर दक्षिण मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी मला बळ द्या. मतदार संघातील दिन दुबळयांचे आश्रू पुसण्यासाठी मला, सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मी या निवडणूकीला सामोरे जात असल्याचे लंके यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी आवाहन केले की, मंगळवारी हनुमान जयंतीच्या दिवशी नागरीकांनी महाविकास आघाडीच्या रावणारूपी लंकेचे दहन करण्याचा निश्चय करावा. यासबंधी प्रश्न विचारण्यात आला असता लंके म्हणाले, कुठलाही नेता आल्यानंतर व्यासपीठावरून बोलताना त्यांच्या पक्षाची बाजू मांडत असताना



टीका केल्यानंतर लोक टाळया वाजवितात. अशा गोष्टींना उत्तर द्यावेच असे काही नसते. ते कोणत्या भावनेने बोलले हे मला माहीती नसल्याचे लंके यांनी सांगितले.

प्रत्येकाच्या घराघरात, मनामनात आपल्या पक्षाचे चिन्ह पोहचविण्यावर भर देण्यात येत आहे. ही निवडणूक जनतेनेच हाती घेतली असल्याने निवडणूकीची दुसरी रणनिती काही नाही नसल्याचे लंके यांनी स्पष्ट केले. हनुमान जयंतीचे औचित्य साधून चाहत्यांनी दोन गदा भेट दिल्याच्या पार्श्वभुमीवर बोलताना लंके म्हणाले, मी हनुमान भक्त आहे, हनुमान भक्तालाच गदा मिळणार. मला गदा मिळणार नाही मग कोणाला मिळणार ? ही सर्वसामान्य जनतेची गदा आहे. हनुमानरायांची गदा पैलवानाला दिली जाते अशी पुष्टीही लंके यांनी यावेळी बोलताना दिली.

मंगळवारी सकाळी नीलेश लंके यांच्या निवासस्थानी त्यांच्या कुटूंबियांसह सुवासिनींनी लंके यांचे औक्षण केल्यानंतर ते अर्ज दाखल करण्यासाठी नगरच्या दिशेने निघाले. नेहमीच्या सवयीप्रमाणे हंगे गावातील हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेतल्यानंतर लंके हे नगरकडे मार्गस्थ झाले.सध्या उष्णता फार आहे. कार्यकर्त्यांना अर्ज दाखल करण्यासाठी उन्हामध्ये येण्याचा त्रास देणे हे मला योग्य वाटले नाही. त्यामुळे साधेपणानेच अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला असल्याचे लंके म्हणाले. लंके यांनी आपण अंध, अपंग बांधव तसेच महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करणार असल्याचे जाहिर केले होते. तरीही जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर महाविकास आघाडीच्या हजारो कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. लंके हे अर्ज दाखल करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात गेल्यानंतर कार्यकर्ते लंके यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करत होते. महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी अंध, अपंग तसेच महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

# मोदी सरकारचे कार्य सर्वस्पर्शी-देवेंद्र फडणवीस






**पुलगाव । प्रतिनिधी**

केंद्रातील मोदी सरकारने समाजातील सर्व घटकांना विविध योजनांच्या माध्यमातून स्वावलंबी करण्याचा प्रयत्न केला. समाजाच्या मूलभूत गरजा ज्या काँग्रेसच्या राजवटीमध्ये कधीच पूर्ण झाल्या नाही. त्या गरजांची पूर्ती करून सर्व समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न मोदी सरकारच्या दहा वर्षाच्या राजवटीत झालेला आहे. , असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महायुतीचे उमेदवार रामदास तडस त्यांच्या प्रचारार्थ पुलगाव येथे आयोजित सभेत ते बोलत होते.

खालील लक्ष्मी सेलिब्रेशन हॉल येथे पार पडलेल्या त्या प्रचंड जाहीर सभेत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मोदीजींनी ज्यांना घर नव्हते अशा वीस कोटी लोकांना पक्के घर उपलब्ध करून दिले. ज्यांच्या घरी स्वयंपाकाचा गॅस नव्हता, अशा ४० कोटी लोकांना उज्वला गॅस च्या माध्यमातून गॅस उपलब्ध करून दिला. ५५ कोटी लोकांना आयुष्यमान भारत च्या माध्यमातून आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली. उद्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसलेल्या सात कोटी लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले. मुद्रा कर्जाच्या माध्यमातून ५५ कोटी बेरोजगारांना स्वतःचा उद्योग उभारण्यास सहाय्य केले. बचत गटातील महिलांना मोठ्या प्रमाणावर मदत केली. वर्धा जिल्हा चाळीस हजार महिलांनी बचत गटाच्या मदतीचा लाभ घेतला. सर्व बँकांना निर्देश देऊन अनुसूचित जातीच्या व्यक्तींना कर्ज उपलब्ध करून देण्यास बाध्य केले. शेतकऱ्यांना शेतकरी सन्मान निधीच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारकडून वर्षाला बारा हजार रुपयांचा निधी उपलब्ध होत आहे. बारा बलुतेदारांना आपला व्यवसाय वाढविण्यासाठी विश्वकर्मा योजनेच्या माध्यमातून काही उपलब्ध केल्या जात आहे. अनेक ठिकाणी उपलब्ध नसलेले रस्ते, उड्डाणपूल यांचे निर्माण करून दळणवळणाची साधने उपलब्ध झाली आहे. कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना निवडणुकीची आचारसंहिता संपल्यावर ४००० कोटीची मदत करण्यात येणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले. आघाडी सरकारचे सर्व नेते आम्ही इंजिन आहे म्हणून सांगतात. इंजिन मध्ये कोणाला बसता येते का? यांचे इंजिनही बंद पडलेले आहे. त्यामुळे महाल युतीच्या विकासाच्या गाडीमध्ये बसण्यासाठी वर्धा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रामदास तडस यांना प्रचंड बहुमताने विजयी करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार मजबूत करावे, असे आवाहन केले.

सभेमध्ये भाजपा जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, किरण उरकांदे, शिवसेना नेते अशोक शिंदे,भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते, रिपब्लिकन पक्षाचे नेते विजय आगलावे, माजी खासदार सुरेश वाघमारे, देवळी विधानसभा निवडणूक प्रमुख राजेश बकाने, भाजप नेते सागर मेघे यांचेही समायोचित भाषण झाले. खासदार तडस, राजेश बकाने, नितीन बडगे यांनी देवेंद्रजीचे स्वागत केले. सभेला आलेल्या स्त्री-पुरुषांनी हातामध्ये कमळाचे चिन्ह धरलेले होते. अनेक वक्त्यांनी भाषणाची सुरुवात भारत माता की जयव जय श्रीराम च्या गजराने केली. सभागृह महिला व पुरुषांनी खचाखच भरलेले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सभागृहाबाहेर टाकलेल्या मांडवामध्ये बसून जाहीर सभेचा आस्वाद घ्यावा लागला. सभेचे संचालन आकाश दुबे यांनी केले.

# आरटीई नियमांना उच्च न्यायालयात आव्हान

## दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना दिलासा
## शिक्षण विभागाला उत्तर सादर करण्याचे निर्देश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सरकारच्या बदललेल्या आरटीई नियमांमुळे इंग्रजी माध्यमांच्या खासगी शाळेत आरटीई अंतर्गत प्रवेशाची वाट कठीण झाली आहे. यामुळे आर्थिक दुर्बल घटकातील पालकांत मोठ्या प्रमाणात संतापाचे वातावरण दिसते. महाराष्ट्र सरकारच्या या नव्या आरटीई नियमांना उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. ज्येष्ठ वकील ड.जयना कोठारी, ड.दीपक चटप, ड.पायल गायकवाड, ड.ऋषिकेश भोयर यांच्या माध्यमातून शिक्षण हक्कांवर काम करणाऱ्या संस्था व कार्यकर्त्यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. उच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या शिक्षण विभागाला नोटीस बजावली असून ८ मे पर्यंत उत्तर सादर करण्यास सांगितले आहे.




आरटीईअंतर्गत वंचित, दुर्बल, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांना २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिले जातात. शालेय शिक्षण विभागाने यंदा आरटीई प्रवेश प्रक्रियेत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. त्यानुसार विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून एक किमी.पर्यंतच्या अनुदानित शाळा, शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत प्रवेश देण्यात येणार आहे. यातील उपलब्ध शाळा नसल्यास स्वयंअर्थसहाय्यित खासगी शाळेत प्रवेश दिला जाणार आहे. नुकतेच आरटीईचे ऑनलाईन अर्ज सुरु झाले आहे. या नियमांची अंमलबजावणी झाल्यास विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. आरटीईतील बदलांमुळे बव्हंशी इंग्रजी माध्यमांच्या विना अनुदानित खासगी शाळेत प्रवेश मिळणार नसल्याने गरीब विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहावे लागेल असे मत याचिकाकर्ते शिक्षण हक्क कार्यकर्ते वैभव एडके, राहुल शेंडे, वैभव कांबळे, अनिकेत कुत्तरमारे यांनी व्यक्त केले आहे.

**नव्या नियमांमुळे श्रीमंतांच्या मुलांसाठी इंग्रजी माध्यमांच्या खासगी शाळा तर गरीब मुलांसाठी शासकीय शाळा अशी वर्गवारी तयार होईल. याआधी हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश, उत्तरप्रदेश आदी राज्यांत खासगी शाळांत मुभा देणारे नियम तेथील सरकारने तयार केले. मात्र तसे नियम हे उच्च न्यायालयाने रद्द केले आहे. २००९ च्या शिक्षण हक्क कायद्यानुसार खासगी विनाअनुदानित शाळांना मुभा देता येत नाही. खासगी शाळांना वेळेत परतावा दिल्यास त्यांचा देखील विरोध होणार नाही. राज्य सरकारचे नवे नियम बेकायदेशीर व अन्यायकारक आहे.**
**ॲड.दीपक चटप**
**अधिवक्ता, उच्च न्यायालय, नागपूर**

# महात्मा गांधी विद्यालयात इंग्रजी दिवस साजरा






**कोरपना । प्रतिनिधी**

गडचांदूर शिक्षण प्रसारक मंडळ, गडचांदूर द्वार संचालित महात्मा विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारला इंग्रजी साहित्यातील जगप्रसिद्ध लेखक व नाटककार विल्यम शेक्सपिअर यांची जयंती 'इंग्लिश डे' म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमाला कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून प्राचार्या तथा मुख्याध्यापिका स्मिता चिताडे यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्याध्यापक अनिल काकडे, उपप्राचार्य प्रफुल्ल माहूरे, केंद्रप्रमुख पंढरीनाथ मुसळे व पर्यवेक्षक शंकर तुराणकर यांची मंचावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्रा. माहुरे यांनी या महान इंग्रजी लेखकाबाबत माहिती दिली व इंग्रजी भाषेचे महत्व पटवून दिले व इंग्रजी भाषा बोलण्याचा सराव कसा करावा याचे मागदर्शन केले. या जयंतीनिमित्ताने विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. ज्यामध्ये इंग्रजी व्याकरणावर आधारित पोस्टर तयार करणे, इंग्रजी व्याकरणावर आधारीत बहुपर्यायी प्रश्नांचा पेपर व बोधकथा सांगणे या तीन स्पर्धा प्रामुख्याने घेण्यात आल्या. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. अध्यक्षीय भाषणातून प्राचार्या स्मित चिताडे यांनी मार्गदर्शन केले ज्यामध्ये विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन व लेखनाचे महत्त्व लक्षात आणून स्वतःमध्ये कसे अनुकूल बदल घडवून आणले पाहिजे या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन संतोष मुंगूले यांनी केले तर आभार प्रा. विवेक पाल यांनी मानले. सदर कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# गोंडवाना विद्यापीठात 'इग्नू' अभ्यास केंद्राचे उद्घाटन

## 'इग्नू' चे अभ्यास केंद्र कार्यान्वीत
## विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक अभ्यासक्रम



**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठात इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे (इग्नू) अभ्यास केंद्र कार्यान्वीत करण्यात आले आहे. या अभ्यास केंद्राचे उद्घाटन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या हस्ते पार पडले.

उद्घाटन कार्यक्रमाला गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अनिल हिरेखन, मा. व्यवस्थापन परीषदेचे सदस्य डॉ. संजय गोरे, डॉ. नंदाजी सातपुते, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नू),नागपूरचे क्षेत्रीय निर्देशक डॉ. लक्ष्मण कुमारवाड, सहायक क्षेत्रीय निर्देशक डॉ. व्यंकटेश्वरलू, अनुभाग अधिकारी श्री. चंद्रशेखर राजगुरे, ब्रम्हपुरी शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. राजन वानखेडे, समन्वयक डॉ. प्रिती पाटील आदी उपस्थित होते.घरची परिस्थिती किंवा विविध अडचणीमुळे कॉलेजला जाणे शक्य नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी तसेच नोकरी-व्यवसाय सांभाळून, अर्धवट राहिलेले उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी 'इग्नू' हा एक उत्तम पर्याय आहे. या माध्यमातून विद्यार्थी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन शिक्षण आणि स्वप्न पूर्ण करू शकतात. काम करता-करता शिक्षण व शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांना नव्याने शिक्षण घेण्याची तसेच अर्धवट राहिलेले उच्च शिक्षण पुर्ण करण्याची संधी गोंडवाना विद्यापीठात कार्यान्वीत इग्नू अभ्यास केंद्राच्या माध्यमातून प्राप्त झाली आहे. या केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना मुक्त व दूरस्थ शिक्षणाची सोय उपलब्ध झाली आहे.

विद्यार्थ्यांसाठी विविध अभ्यासक्रम:इग्नू अध्ययन केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी डिप्लोमा इन क्रिएटिव्ह रायटिंग इन इंग्लिश, सर्टिफिकेट इन रुरल डेव्हलपमेंट, डिप्लोमा इन इव्हेंट मॅनेजमेंट, सर्टिफिकेट इन फूड अँड न्यूट्रिशन, मास्टर ऑफ आर्ट (रुरल डेव्हलपमेंट) आदी अभ्यासक्रम असणार आहे.

विद्यार्थ्यांनी प्रवेशाकरीता तसेच अधिक माहितीकरीता इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नू) अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. प्रिती पाटील (८२७५३९९३००) यांच्याशी संपर्क साधावा.

# तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी विरोधकांच्या तुतारीची फुकारी करतील

## आमदार शहाजीबापूंची मोहिते पाटलांवर सडकून टीका

**सांगोला । प्रतिनिधी**

रामायण, महाभारत संपेल पण मोहिते पाटील आणि शहाजीबापूंचा इतिहास संपणार नाही. मोहिते पाटलांनी ५० वर्षे सांगोला तालुक्याचं नीरा उजवा कालव्याचं पाणी अडवलं. गेल्या पाच वर्षात टेंभू, म्हैसाळ, नीरा उजवा कालवा या सिंचन योजनेचे पाणी आले आहे. ऐन उन्हाळ्यात कोयना धरणातून पहिल्यांदा माण नदीत सोडले आहे. ५५ वर्षे भोगलेल्या दुष्काळाच्या झळा काळजात असतील तर या तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी विरोधकांच्या तुतारीची फुकारी केल्याशिवाय राहणार नाहीत अशी सडकून टीका आमदार शहाजीबापू पाटील यांनी केली.



माढा लोकसभेचे महायुतीचे उमेदवार खा. रणजितसिंह निंबाळकर यांच्या प्रचारार्थ बुधवार २४ एप्रिल रोजी सांगोला तालुक्यात खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील, माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील, आमदार जयकुमार गोरे, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉर्नर सभा पार पडली. पुढे बोलताना आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, पवारांना, विजयदादांना निवडून दिलं, पण काय काम केले ते दिसले नाही. नीरा उजवा कालवा सिंचन योजनेतून एक टीएमसी पाणी वाढवून दिले आहे. गेल्या वर्षीच्या खरीप हंगामातील नुकसानीचे अनुदान प्रत्येक शेतकऱ्याला मिळाले पाहिजे यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मोहिते पाटील पाण्यासाठी सांगोल्याला पैसे देणार नाहीत, तुतारी घात करील. ज्यांनी ५० वर्षे सांगोल्याला पाणी मिळू दिले नाही तेच मोहिते पाटील निवडणुकीत मते मागत आहेत. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी साथ दिली आहे. उजनीचं पाणी पळवून नेलं तर रक्तरंजीत क्रांती केली जाईल असा इशारा दिला होता म्हणून उजनीचं दोन टीएमसी पाणी तालुक्याला मिळणार असल्याचे आमदार शहाजी बापू पाटील यांनी सांगितले.यावेळी बोलताना भाजपचे उमेदवार खासदार रणजितसिंह निंबाळकर म्हणाले, पवार साहेब राजकारणातले जाणते नेते असतानाही त्यांनी या मातीत निवडून आल्यानंतर इथल्या योजना, पाणी, रस्ते, योजना, रोजगार बारामतीला गेला, म्हणून शरद पवारांच्या भूमिकेचा तिटकारा आला. पवारांशी ताकदीने वाद घालून, त्यांच्याशी लढून पाणी आणावं लागलं. ज्या वेळेस इस्टेटीची वाटणी होते, त्यावेळी एकाच पोराला सगळी इस्टेट दिली तर त्याला शहाणा बाप कोण म्हणेल का ?. तसंच बारामतीच्या पवारांना शहाणा बाप कसा म्हणायचं अशा तीव्र शब्दात खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी पवारांवर निशाणा साधला. पवारांनी मावळत्या सूर्याची शपथ घेवून सांगोला तालुक्याला दुष्काळमुक्त करण्याचा शब्द दिला होता. सूर्य देखील मावळला आणि पवार साहेब देखील मावळले पण सांगोल्याचा प्रश्न सुटला नाही. पवारांनी पाण्याचा प्रश्न सोडविण्याऐवजी माढा मतदारसंघाचे हक्काचे पाणी बारामतीला पळवून नेले.

**खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी रस्ते, पाण्यांसह विविध विकास कामांसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध केला आहे. सांगोल्याला पाण्यासाठी ५० वर्षे संघर्ष करावा लागला. खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी पाण्याचा प्रश्न सोडवून न्याय दिला. सांगोला तालुक्याच्या विकासासाठी आमदार शहाजीबापूंनी कोट्यावधी रुपयांचा निधी आणला आहे. - दीपकआबा साळुंखे पाटील, माजी आमदार**

मोहिते पाटील यांनी पतसंस्था, बँका, साखर कारखाने बुडवले, घोटाळे केल्याचा आरोप खा. रणजितसिंह निंबाळकर यांनी केला. यावेळी शिवसेना नेते भाऊसाहेब रुपनर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तानाजीकाका पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, राजश्री नागणे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष मधुकर बनसोडे, भाजप तालुकाध्यक्ष अतुल पवार, दुर्योधन हिप्परकर, रयत क्रांती संघटनेचे तालुकाध्यक्ष भारत चव्हाण, उत्तम खांडेकर, मनसेचे जिल्हाध्यक्ष विनोद बाबर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .